महाराष्ट्र शासन

विद्युत निरीक्षक (सचिव,अनुज्ञापक मंडळ)
उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
रामकृष्ण चेंबुरकर मार्ग,चेंबुर, मुंबई-४०००७१

ईमेल: eislbnlift.nrg-mh@gov.in

दुरध्वनी : ०२२-२५२८५९६७

जा.क्र.विनि(सअमंवउनि)/ मु.ली. ६३८७ /२०२५

दिनांक:- ०१.०९.२०२५

## विद्युत पर्यवेक्षक व तारतंत्री यांच्या माहे नोव्हेंबर-२०२५ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षेची जाहिरात

विद्युत पर्यवेक्षक लेखी परीक्षा दि.२२/११/२०२५ रोजी व तोंडी परीक्षा दि.२३/११/२०२५ रोजी मुंबई / पुणे / छ.संभाजी नगर व नागपूर या ठिकाणच्या केंद्रातून घेण्यात येतील, तसेच तारतंत्री परीक्षा दि.२७/११/२०२५ पासून मुंबई/पुणे/ कोल्हापुर/ छ.संभाजी नगर/ नाशिक /नागपुर व अमरावती या केंद्रातून घेण्यात येतील, दोन्ही परिक्षेकरीता अर्ज नमुना १२ म, "सी" व "ई" यामध्ये तसेच दोन्ही परिक्षेच्या पुन:प्रवेशाकरीता अर्ज नमुना १२ म व "डी" यामध्ये सुवाच्छ अक्षरात / टंकलिखित पूर्ण भरुन संबंधित जिल्हयाचे विद्युत निरीक्षक किंवा विद्युत निरीक्षक, (सचिव, अनुज्ञापक मंडळ) यांचेकडे सादर करावेत. अर्ज सादर करणे, अर्ज मंजूर / नामंजूर यादी जाहीर करावयाचा दिनांक/ त्रूटी पूर्तता करावयाचा अंतिम दिनांक व इतर बाबी खाली दर्शविल्या प्रमाणे आहेत. मंजूर /नामंजूर/ त्रुटी अर्जाची यादी संबंधित अधीक्षक अभियंता/ विद्युत निरीक्षक किंवा विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ) कार्यालयात खाली नमूद केलेल्या दिनांकानुसार पाहावयास मिळेल. खाली नमुद करण्यात आलेल्या परीक्षा शुल्काचा भरणा शासनाच्या GRAS प्रणाली व्दारे ऑनलाईन पध्दतीने किंवा बँकेत चलनाव्दारे भरणा करुन त्याची मुळ पावती अर्जासोबत जोडावी, उमेदवारांनी अर्जासोबत स्वयंसाक्षांकित केलेली खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. परीक्षेकरीता आवश्यक फॉर्म www.ceimah.in या संकेतस्थळावर किंवा संबंधीत विद्युत निरीक्षक कार्यालयात उपलब्ध आहेत.

### तारतंत्री परीक्षा

१)महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)
२) अनुभवाचा पुरावा किवा विद्युत कंत्राटदाराच्या हजेरीपटाची प्रत
३) निवासी पुरावा ( पासपोर्ट/ आधार कार्ड / मतदान कार्ड यापैकी कोणतेही एक)
४) 3 रंगीत पासपोर्ट (२*२) इंच आकाराचे अलीकडच्या काळातील फोटो
५) अर्जदाराचा पत्ता असलेले व रु.५/- चा स्टॅम्प लावलेले २८ से.मी. x १२ से. मी आकाराचे दोन लिफाफे
६) अर्जदाराचा पत्ता असलेले व रु.४५/- चा स्टॅम्प लावलेले ४० से.मी. २९ से. मी आकाराचा एक लिफाफा
७) शैक्षणीक प्रात्रता प्रमाणपत्र

### विद्युत पर्यवेक्षक परीक्षा

वरील यादीतील अनुक्रमांक १ ते ७ व्यतिरीक्त खालील कागदपत्रे जोडावीत,
८) तारतंत्री परवाना व प्रमाणपत्राची छायाप्रत व विद्युत अभियांत्रीकी क्षेत्रातील किमान २ वर्षाचा अनुभव
९) एसएससी मार्कलिस्ट / प्रमाणपत्र
१०) विद्युत अभियांत्रिकी पदवी / पदविका याखेरीज इतर शाखेमध्ये पदवी / पदविका प्राप्त उमेदवारांकरीता
अ) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या विद्यापिठाची / मंडळाची / संस्थेची पदवी / पदविका
ब) विद्युत अभियांत्रिकीच्या क्षेत्रातील किमान एक वर्षाचा प्रत्यक्ष कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र

### पर्यवेक्षक परीक्षेकरीता

| अ.क्र. | विषय | दिनांक |
|---|---|---|
| १. | अर्ज वितरण | ०८/०९/२०२५ पासून |
| २. | पूर्ण भरलेला अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख | १३/१०/२०२५ |
| ३. | अर्ज मंजूर / नामंजूर/ त्रुटीची यादी मंडळ व विभागीय कार्यालयात प्रसिध्द करावयाचा दिनांक | १७/१०/२०२५ |
| ४. | अर्जामध्ये त्रूटी असल्यास पूर्तता करावयाचा अंतिम दिनांक सर्व केंद्राकरीता | २९/१०/२०२५ |
| ५. | परीक्षा दिनांक (सर्व केंद्राकरीता) | |
| | लेखी परीक्षा (Written) | २२/११/२०२५ |
| | तोंडी परीक्षा (Oral) | २३/११/२०२५ |
| ६. | परीक्षा शुल्क | रु. ५००/- |

### तारतंत्री परीक्षेकरीता

| अ.क्र. | विषय | दिनांक |
|---|---|---|
| १. | अर्ज वितरण | ०८/०९/२०२५ पासून |
| २. | पूर्ण भरलेला अर्ज जमा करण्याची शेवटची तारीख | १७/१०/२०२५ |
| ३. | अर्ज मंजूर / नामंजूर/ त्रुटीची यादी जिल्हा व विभागीय कार्यालयात प्रसिध्द करावयाचा दिनांक | २९/१०/२०२५ |
| ४. | अर्जामध्ये त्रूटी असल्यास पूर्तता करावयाचा अंतिम दिनांक सर्व केंद्राकरीता | ०७/११/२०२५ |
| ५. | परीक्षा दिनांक (सर्व केंद्राकरीता) मुंबई/पुणे/ कोल्हापुर/ छ.संभाजी नगर / नाशिक / नागपुर व अमरावती | २७/११/२०२५ पासुन |
| ६. | परीक्षा शुल्क | रु.५००/- |

वर उल्लेखित करण्यात आलेल्या त्रूटीच्या पूर्तता दिनांकानंतर त्रूटी असलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, मंडळ कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज मंजूर / नामंजूर करण्याचे सर्व अधिकार संबंधित अधीक्षक अभियंता किंवा विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ) यांनी राखून ठेवलेले आहेत. परिक्षेचे अर्ज दि. ०८/०९/२०२५ पासून संबंधित विद्युत निरीक्षक कार्यालयात कार्यालयीन वेळेत स्विकारले जातील. विद्युत पर्यवेक्षक परीक्षा फक्त मराठी/ हिंदी /इंग्रजी या भाषांतुन घेण्यात येतील. इतर तपशीलासाठी विद्युत निरीक्षक ( सचिव, अनुज्ञापक मंडळ) मुंबई अथवा अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मुंबई, पुणे, छ.संभाजी नगर व नागपुर तसेच जिल्हाचे संबंधित विद्युत निरीक्षक यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

( अ.सो.पाटील)
विद्युत निरीक्षक
(सचिव, अनुज्ञापक मंडळ)

प्रत:- अध्यक्ष,अनुज्ञापक मंडळ तथा मुख्य विद्युत निरीक्षक, उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत:- अधीक्षक अभियंता मुंबई /पुणे/छ.संभाजी नगर/नागपुर, प्रादेशिक विद्युत निरीक्षक मंडळ, उद्योग, ऊर्जा कामगार व खनिकर्म विभाग, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत:- सर्व विद्युत निरीक्षक यांना योग्य त्या कार्यावाहीकरीता सस्नेह अग्रेषीत

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner